लोकसत्ता पु.पा. १.

# मेट्रो कारशेडला ग्रामस्थांचा विरोध कायम

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** राई गावात मेट्रो कारशेड उभारण्यासाठी आरक्षित केलेल्या जमिनीसंदर्भातील सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यावेळी कारशेड विरोधात नोंदवलेल्या १ हजार २२ हरकतदारांनी आपला विरोध कायम ठेवला आहे.

मीरा -भाईंदर मेट्रो मार्गिका ९ चे काम गेल्या अडीच वर्षांपासून प्रगतिपथावर सुरू आहे. मार्गिकेसाठी आवश्यक कारशेडची जागा भाईंदर पश्चिम येथील राई-मोरवा गावालगत ८७ एकरात एमएमआरडीएने निश्चित केली आहे. आराखड्यातदेखील आरक्षित करण्याची कार्यवाही एमएमआरडीएच्या आदेशानुसार कोकण नगररचना विभागाकडून केली जात आहे. प्रकल्पामुळे शेतजमिनी, घरे बाधित होणार असल्याने त्या विरोधात ११७६ हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. त्यानुसार कोकण नगराच्या विभागाकडून दाखल हरकतींवर ३० जानेवारीपासून मुख्यालयात सुनावण्या करण्यात आल्या. तीन दिवसांपासून हरकतीदारांनी पालिका कार्यालयात गर्दी केली होती. अखेरच्या दिवसापर्यंत जवळपास १ हजार २२ हरकतीदारांनी विरोधात त्याचे मत सुनावणी समितीसमोर मांडले असल्याची माहिती उपस्थितीत अधिकाऱ्यांनी दिली.

### ग्रामस्थांची नाराजी

भाईंदर पश्चिम येथील राई गावात नियोजित करण्यात आलेले मेट्रो कारशेड ग्रामस्थांच्या विरोधामुळे उत्तन येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनावेळी केली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी घोषणा करूनदेखील आजवर या संदर्भातील लेखी आदेश प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. शिवाय त्यानंतरही सुनावणी प्रक्रिया राबवली जात असल्याने येथील ग्रामस्थ नाराज झाले असून कारशेडला विरोध करत आहेत.

# मोटार आणि ट्रकच्या अपघातात एकाचा मृत्यू

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** विरार पूर्वेच्या महामार्गावरील खानिवडे उड्डाणपुलावर गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास मोटार आणि ट्रकच्या अपघातात मोटार चालकाचा जागीच मृत्यू झाला.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून एक मोटार भरधाव वेगाने गुजरातच्या दिशेने जात होती. याच दरम्यान वाहनाचा पुढचा उजव्या बाजूचा टायर अचानक फुटल्याने गाडी अनियंत्रित होऊन मुंबई वाहिनीवर आली. त्या वेळी समोरून येणाऱ्या ट्रकची जोरदार धडक बसली. यात ट्रक जागेवर उलटला. मोटारचालक अरुणकुमार जीवनभाई पारेख (३८) याचा मृत्यू झाला. गुजरात येथील गांधीनगर परिसरात तो राहत होता. या घडलेल्या अपघातामुळे खडीही रस्त्यावर सांडली होती त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. महामार्ग वाहतूक पोलीस व मांडवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

लोकसत्ता पु.पा. ३.

# मीरा रोड येथे तरुणीला मारहाण करून विकृत कृत्य

## फरार तरुणाचा शोध सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** एका तरुणीला तिच्या माजी प्रियकराने बंद खोलीत अमानुष मारहाण करून विकृत कृत्य करायला भाग पाडल्याची धक्कादायक घटना मीरा रोड येथे घडली आहे. हा तरुण फरार असून काशिमीरा पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पीडित तरुणी २१ वर्षांची असून ठाण्यात राहते. तिचे २२ वर्षीय तरुणासोबत प्रेमसंबंध होते. मात्र, एक वर्षानंतर त्यांचे प्रेमसंबंध तुटले आणि तरुण कोलकाता येथे निघून गेला. काही दिवसांपूर्वी तो परत आला आणि त्या तरुणीच्या अश्लील छायाचित्रांच्या आधारे तिला ब्लॅकमेल करून भेटायला बोलावले. काशिमीरा येथील एका लॉजमध्ये बोलावून तिला पट्ट्याने अमानुष मारहाण केली. तसेच तिला थुंकी चाटण्यासाठी भाग पाडले.

याप्रकरणी बुधवारी तरुणीने काशिमीरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरोधात बलात्कार, अनैसर्गिक कृत्य, मारहाण अशा विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी तरुण फरार असून, त्याचा आम्ही शोध घेत आहोत, अशी माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन पोतदार यांनी दिली.

CamScanner

सामना पा. नं. ६

**हत्येचे गूढ उकलले ■ पत्नीसह तीन जणांना बेड्या**

# पत्नीनेच दिली हत्येची सुपारी

वसई, दि. २ (सा.वा.) – पत्नीने १ लाखाची सुपारी देऊन पतीचा काटा काढल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नायगाव रिक्षा स्टॅण्डजवळील खाडीत एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला होता. मानेवर आणि डोक्यात धारदार शस्त्राने वार करून मृतदेह फेकल्याने हा घातपाताचा प्रकार असावा, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आणि त्या दिशेने तपास सुरू केला. दरम्यान या घटनेचा उलगडा करण्यात गुन्हे शाखेला यश आले. पत्नीनेच साथीदारांच्या मदतीने पतीची हत्या केल्याचे तपासात उघड झाले. याप्रकरणी पत्नीसह तीन जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

नायगाव रिक्षा स्टॅण्डजवळील ब्रिजखाली खाडीत २७ जानेवारीला शरीरावर वार करून हत्या केलेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली. मृतदेह ताब्यात घेत पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. तपासात हा मृतदेह कमररुद्दीन अन्सारी (३५) या व्यक्तीचा असल्याचे समजले. कमररुद्दीन राहात असलेल्या गोरेगाव परिसरात पोलिसांनी चौकशी केली. यावेळी शेजारी राहणारे आरोपी बिलाल ऊर्फ मुल्ला पठाण (४०), त्याची पत्नी सौफिया पठाण (२८) हे घटना घडल्यापासून परिसरातून निघून गेल्याची माहिती मिळाली. ते गुजरातच्या वापी येथे असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी दोघांच्या मुसक्या आवळल्या. पोलिसी खाक्या दाखवताच पैशाच्या हव्यासापोटी हत्या केल्याचे कबूल केले. त्यानंतर हत्येची सुपारी देणारी पत्नी आशिया अन्सारी हिला वालीव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सामना पा. नं. ७.

# मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय तपासात नंबर वन

## गुन्हे उघडकीचे प्रमाण ८५ टक्क्यांवर

भाईंदर, दि. २ (सा.वा.) – मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय तपासात नंबर वन राहिले असून तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी अनेक उपक्रम राबवत गुन्हे उघडकीचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेले होते. त्यानंतर पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्याला प्रथम प्राधान्य दिले. यामुळे शहरातील गुन्हेगारीला आळा बसला असून आयुक्तालयातील उघड गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्क्यांपर्यंत झाले आहे.



पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आयुक्तालयात प्रत्येक महिन्यात होणाऱ्या आढावा बैठकीत सन्मानित करण्यात येते. मीरा-भाईंदर व वसई-विरार शहरातील अत्यंत क्लिष्ट गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास केल्यामुळे अनेक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२१ या वर्षात खुनाचे ५२ गुन्हे दाखल होते. त्यापैकी ४७ गुन्हे उघडकीस आले होते. उघडकीस आणल्या जाणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण ९० टक्के होते, तर २०२२ मध्ये खुनाचे ३८ गुन्हे दाखल असून १०० टक्के गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

### १६ पोलीस ठाण्यांचा आलेख चढा

खून, विनयभंग, अपहरण, दुखापत, चेन चोरी व इतर जबरी चोरी यांचे २०२१ व २०२२ मधील दाखल व उघड गुन्ह्यांचे प्रमाण पाहिले असता २०२२ या वर्षात सर्वात अधिक गुन्हे उघडकीस आणण्यात आले. आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलीस ठाण्यांमध्ये २०२२ पर्यंत उघड गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्के आहे.

CamScanner

लोकसत्ता ५.५१.१.

# टँकरच्या बेदरकार वाहतुकीला चाप

## सूचना देऊनही नियमांचे पालन होत नसल्याने कारवाईची मोहीम

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई, विरार शहरातील बहुतांश टँकरची कालमर्यादा संपलेली असून ते बेदरकारपणे वाहन चालवत असल्याने अपघातांमध्ये वाढ झाली आहे. टँकरला आवर घालून अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून कारवाईची मोहीम सुरू केली जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत वैधता संपलेले, गळके टँकर शोधून त्यांच्यावर कारवाई केली जाईल असा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

वसई विरार शहरात वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणी उपलब्ध नसल्याने शहरात मोठी पाणीटंचाई आहे. त्यामुळे इमारती, चाळी, गृहसंकुले अशा ठिकाणी टँकरची मागणी अधिक असून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. वसई विरारमध्ये सुमारे एक हजाराहून अधिक टँकर शहरातील रस्त्यावर धावतात. काही टँकर चालक-मालक कोणत्याच नियमांचे पालन करीत नसल्याने सातत्याने अपघाताच्या घटना समोर येत असतात. काही टँकरची कालमर्यादा संपलेली आहे, तर काही टँकरच्या टाक्या गंजलेल्या असून त्यातूनही मोठ्या प्रमाणात पाणी गळती होऊन रस्त्यावर सांडते याचा फटका दुचाकीस्वारांना बसू लागला आहे. तसेच जास्तीचे फेरे लागावे यासाठी टँकरचालक हे बेदरकारपणे टँकर चालवितात, त्यामुळे अपघात घडतात. नुकताच २६ जानेवारी रोजी नालासोपारा पूर्वेच्या भागात २४ वर्षीय तरुणाचा टँकर खाली चिरडून मृत्यू झाला होता. याआधीसुद्धा अशा अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत. वारंवार सूचनाही करूनही नियम पायदळी तुडविले जातात. याचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसतो. टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र, परवाना बॅच, क्लीनर, पाणी गळती, रिफ्लेक्टर अशा बाबी तपासून घेतल्या जाणार आहेत अशी माहिती परिमंडळ २ चे वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले आहे.

> **टँकरद्वारे होणारे अपघात कमी करण्याच्या दृष्टीने विशेष मोहीम हाती घेतली जाणार आहे. यामध्ये टँकरची तपासणी व इतर सर्व कागदपत्रे तपासली जातील जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली जाईल.** - सागर इंगोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक परिमंडळ २

पुण्यनगरी ५.५१.१.

# कार-ट्रकची धडक, एकाचा मृत्यू

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खानिवडे टोलनाक्याजवळ कार व खडी वाहून नेणाऱ्या ट्रकमध्ये धडक झाल्याने अपघात झाला. या अपघातात कारचा चक्काचूर झाला असून, चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवारी सकाळी ९.३० च्यादरम्यान घडली. मुंबईहून गुजरात दिशेने कारचालक जात होता. खानिवडे ब्रिजवर पोहोचला असता, ओव्हरटेक करताना कारचा टायर फुटला व समोरून मुंबई दिशेने खडी वाहून येणाऱ्या ट्रकला धडक बसून अपघात झाला. अपघात तीव्र असल्याने खडीचा ट्रक जागीच पलटी झाला. कार चालकाचा जोरदार ठोकर बसल्याने जागीच मृत्यू झाला, तर ट्रक चालक जखमी झाला आहे. या खडी महामार्गावर पसरल्याने काहीकाळ वाहतूक कोंडी झाली होती.

# गुटखा वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**मीरा रोड :** काशिमीरा वाहतूक पोलिसांनी संगणाई देवी नाका, काशिमीरा येथे इको गाडीतून गुटखा वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली असून दोघांना अटक केली आहे. या आरोपींकडून इको गाडीसहित ३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. मीरा-भाईंदर शहरात गुटखा मोठ्या प्रमाणात विकला जात असून हा गुटखा परराज्यातून वाहतूक करून आणला जात आहे. काशिमीरा वाहतूक पोलिसांना एका इको गाडीतून गुटखा वाहतूक करताना आढळून आली. या गाडीतून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा आढळून आला. पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. इको गाडीसहित तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा वाहतूक करणाऱ्यांवर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुटखा कोठून आणला, कोठे घेऊन जाणार होते, याचा पुढील तपास काशिमीरा पोलीस करत आहेत.

> **तीन लाखांचा मुद्देमाल जप्त**

CamScanner

लोकसत्ता ५.५१.२०

# नायगाव पोलीस ठाणे लवकरच सुरू होणार

## वसईतील ११ वे पोलीस ठाणे

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन नायगाव पोलीस ठाणे तयार करण्यात येत आहे. या ठाण्याचे कामही अंतिम टप्प्यात असून, पुढील १५ दिवसांत हे पोलीस ठाणे सुरू होणार आहे. हे वसईतील ११ वे आणि आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील हे १७ वे पोलीस ठाणे असणार आहे.

वसई-विरार, मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालय सुरू झाल्यानंतर शहरातील विविध ठिकाणच्या भागात पोलीस ठाण्याचा विस्तार होऊ लागला आहे. सुरुवातीला मीरा-भाईंदर व वसई-विरार मिळून केवळ ११ पोलीस ठाणी होती. त्यानंतर टप्प्याटप्प्याने एक एक करून नवीन पोलीस ठाणी तयार करण्यात येत आहेत. मागील दोन वर्षांत पेल्हार, आचोळे आणि मांडवी, ही तीन नवीन पोलीस ठाणी तयार करण्यात आली आहेत. आता वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन नायगाव पोलीस ठाणे तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

नायगाव पूर्वेतील साई एनक्लेव्ह या इमारतीत नायगाव पोलीस ठाण्यासाठी आठ गाळे भाडेतत्त्वावर घेण्यात आले आहेत. तेथे पोलिसांना बसण्यासाठी व दैनंदिन कामकाजासाठी केबिन तयार करण्यात आल्या आहेत. सध्या स्थितीत लाकडी फर्निचर व विद्युतचे काम सुरू असून, येत्या १० दिवसांत हे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे नायगाव परिसरासह इतर गावांसाठी लवकरच नायगाव पोलीस ठाणे सुरू होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. रमेश भामे यांची या नियोजित पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. इतर कर्मचारी नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

नायगाव पूर्वेचा भाग व त्याच्या आजूबाजूचा परिसर हा झपाट्याने विकसित होऊ लागला आहे. कायदा सुव्यवस्था व इतर घडणारे गुन्हे या दृष्टीने नायगाव पोलीस ठाणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.



साई एनक्लेव्ह इमारतीत पोलीस ठाण्याचे सुरू असलेले काम.

### बोळिंज पोलीस ठाणे लांबणीवर

विरारच्या बोळिंज येथेही नवीन पोलीस ठाणे तयार करण्यासाठी आयुक्तालयातर्फे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, मात्र अजूनही त्यासाठीची जागा व इतर आवश्यक बाबी यांची पूर्तता न झाल्याने बोळिंज पोलीस ठाणे हे लांबणीवर पडणार आहे.

CamScanner

सामना पा. नं. २०

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपाचा लाखो विद्यार्थ्यांना फटका

# राज्यातील सर्व विद्यापीठांच्या पुढील परीक्षा स्थगित

## तब्बल ४० हजार कर्मचाऱ्यांची परीक्षा कामकाजाकडे पाठ

**मुंबई, दि. २ ( प्रतिनिधी ) - महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेल्या संपाचा फटका राज्यातील लाखो विद्यापीठ तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसला आहे. सध्या विद्यापीठांत हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा सुरू असून राज्यातील तब्बल ४० हजार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षा कामकाजाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठासह सर्व विद्यापीठांच्या पुढील परीक्षा स्थगित करण्याची नामुष्की विद्यापीठांच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळावर ओढवली आहे.**

अकृषी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने गुरुवार २ फेब्रुवारीपासून परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. या संपाच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी १ फेब्रुवारीला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या समवेत कृती समितीच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली. मात्र या बैठकीत ठोस निर्णय न घेता आंदोलनकर्त्यांची केवळ आश्वासनावरच बोळवण केल्याने परीक्षांचे काम न करण्याच्या निर्णयावर ठाम राहण्याचा निर्णय कृती समितीने घेतला. या निर्णयाची झळ आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना बसली. २ फेब्रुवारी रोजी परीक्षा कशाबशा पार पडल्या. मात्र आजची परिस्थिती पाहून अनेक विद्यापीठांनी उद्या ३ फेब्रुवारीपासून होणाऱ्या परीक्षा स्थगित केल्या आहेत.

### मुंबई विद्यापीठाच्या सुधारित परीक्षांचे वेळापत्रक लवकरच

मुंबई विद्यापीठाच्या ३ फेब्रुवारीपासूनच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. स्थगित केलेल्या सर्व परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल, असे विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रसाद कारंडे यांनी सांगितले. सदर आंदोलनामुळे परीक्षेच्या कामकाजामध्ये अडचणी निर्माण झाल्याने पुढील सर्व परीक्षा स्थगित करत असल्याचे मुंबई विद्यापीठाने जाहीर केले आहे. तसेच गुरुवारी सकाळ सत्रातील एमए सत्र ४, एमए हिंदू स्टडीज, दुपारी सत्रातील एमएस्सी सत्र ४, एमकॉम सत्र २ (सिबीजीस), एमकॉम सत्र २ (चॉइसबेस), एलएलबी सत्र ३, एलएलबी / बीएलएस सत्र ३ (५ वर्षीय ), एमकॉम भाग १ (वार्षिक), बी.व्होक. हेल्थ केअर सत्र ५, बी.व्होक. हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझम सत्र ५ या परीक्षा सुरळीत पार पडल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले.



मुंबई विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकत गुरुवारी सकाळी विद्यापीठ संकुलात आंदोलन केले.

### या विद्यापीठांना संपाची झळ

मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एसएनडीटी महिला विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, गोंडवाना विद्यापीठ, कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, स्वामी रामनंदतीर्थ नांदेड विद्यापीठ, बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

### राज्य सरकारवर विश्वास नाही

आतापर्यंत राज्य सरकारने आमच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी केवळ आश्वासनेच दिली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आम्हाला आश्वासनांचे गाजर दाखविले जाते. मात्र परीक्षा संपल्यानंतर या आश्वासनांची पूर्तता करण्याचा विसर पडतो. मात्र यंदा आम्ही फसणार नाही. आमच्या मागण्यांवर ठोस निर्णय येईलपर्यंत आम्ही आंदोलन सुरूच ठेवणार आहोत. सरकारला २० फेब्रुवारीपर्यंतची मुदत आहे. तोवर निर्णय न घेतल्यास विद्यापीठ, महाविद्यालये बेमुदत बंद करण्याचा इशारा आम्ही दिला आहे.

■ अजय देशमुख, प्रमुख संघटक,
राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती

सकाळ ५.५.२०

# वसईची तुंबई टळणार

## आयुक्तांचा दावा; उपाययोजनांसह रस्त्यांची उंची वाढवणे सुरू

**प्रसाद जोशी :** सकाळ वृत्तसेवा

वसई, ता. २ : वसई-विरार शहर पावसाळ्यात पाण्याखाली जाते. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात पाणी तुंबू नये, यासाठी महापालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार रस्त्याची उंची वाढवण्यासोबत इतर उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. यात पहिल्या टप्प्यात वसई पश्चिमेला कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

वसई-विरार शहरात छोटे-मोठे २०४ नाले आहेत. मात्र तरीही पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे पावसाळ्यात शहरात पाणी साचते. त्यामुळे यंदा नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण, अतिक्रमण हटवणे, अशा उपाययोजनांवर महापालिकेकडून भर दिला जाणार आहे. तसेच कल्व्हर्ट संख्या वाढवली जाणार असल्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. तसेच वालीव, सातिवली, एव्हरशाईन, वसंतनगरी व सनसिटी येथील रस्त्यांची उंची वाढवणार आहेत. रस्त्याची उंची वाढवल्यास पाण्याचा अडसर निर्माण होणार नाही, असे पालिकेचे म्हणणे आहे.




वसई : सनसिटी येथे पाणी साचू नये यासाठी रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

### देवतलाव, नाळा आणि सोपाऱ्याचे काय ?

शहरातील रस्ते उंच अथवा अन्य उपाययोजना करण्यात येणार आहेत; पण नाळा गाव, सोपारा गाव, निर्मळ, देवतलाव सह इतर गावांतील रस्तेदेखील पावसात पाण्याखाली येत असतात. त्यामुळे याठिकाणी कोणत्या उपाययोजना करणार हे मात्र अद्याप प्रशासनाने स्पष्ट केले नाही.

### केली जाणारी कामे

- सनसिटी मार्ग चार कोटी
- अंबाडी ते एव्हरशाईन मार्ग - नऊ कोटी
- कोंडीची अडचण दूर करण्यासाठी आठ जागा निश्चित
- शहरात ठिकठिकाणी कल्व्हर्ट बसवणार

प्रवासी, सर्वसामान्य नागरिकांना पावसाळ्यात वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून रस्त्यांची उंची वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सनसिटी, वालीव, सातिवलीसह अन्य भागांत हे काम केले जाणार आहे.

- अनिलकुमार पवार,
**आयुक्त, महापालिका**

CamScanner

नंबर प्लेट से छेड़छाड़ करने वालों की खैर नहीं
...पेज-3

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, शुक्रवार 3 फरवरी 2023

शुभमन के फैंस ने लगाए सारा भाभी के नारे
...पेज-6

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक-25 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुमित आचार्य

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| माघ, शुक्ल पक्ष, त्रयोदशी | 7.13am 6.33pm | सुबह मौसम थोड़ी ठंड दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 32°C न्यूनतम 22°C | NSE OPEN 17,517.10 \| CLOSE 17,610.40 BSE OPEN 59,708.08 \| CLOSE 59932.24 | GOLD 58,470 Per 10 Gm SILVER 74,700 Per Kg |

# नंबर प्लेट से छेड़छाड़ करने वालों की खैर नहीं



## अपराध और दुर्घटना के वक्त पुलिस को होती है परेशानी











## आदेश की धज्जियां उड़ाने वालों पर कारवाई

संवाददाता MHT
राकेश सिंह

नालासोपारा। पुलिस द्वारा लगातार कार्रवाई किए जाने के बावजूद यातायात नियमों के साथ खिलवाड़ करने वालों की खैर नहीं है। कुछ लोग नियम और कानून से खिलवाड़ करते हुए अपनी गाड़ियों के नंबर प्लेट पर जाति सूचक शब्दों का उपयोग करते हैं। वसई-विरार में ऐसे बहुत से वाहन मिल जाएंगे, जिनके नंबर प्लेट पर 'दादा', 'मामा', 'काका', अवा', 'नाना' जैसे शब्द खास तरीके से लिखे हुए होते हैं।

जिन पर पंडित, क्षत्रिय, त्यागी, ठाकुर, यादव, खान, राजपूताना, चौधरी, यदुवंशी आदि लिखा हुआ होता है। वाहन अधिनियम के मुताबिक नंबर प्लेट पर सिर्फ गाड़ी नंबर होना चाहिए। इसके अलावा अगर कुछ भी लिखा मिलता है तो उसके खिलाफ सख्त कारवाई के प्रावधान हैं। इसके बावजूद लोगों की मनमानी रुकने का नाम नहीं ले रही।

### क्या कहता है कानून

वाहन अधिनियम के तहत दोपहिया, तीन पहिया वाहनों से लेकर कार व बड़े वाहनों की नंबर प्लेट पर शब्दों व अंकों की ऊंचाई से लेकर मोटाई और रंग मानक के अनुसार होते हैं। वाहनों की पिछली नंबर प्लेट पर लिखे जाने वाले अंकों और शब्दों की ऊंचाई, मोटाई और नंबरों के बीच खाली स्थान पांच मिमी होनी चाहिए।

## पुलिस की नजरों से बचने में आता है काम

वाहनों पर फैंसी नंबर प्लेट लगाना गैर कानूनी है। बावजूद इसके शहर में कई मोटर चालक हैं, जो फिर भी नियम-कानून का पालन नहीं कर रहे हैं। आपराधिक गतिविधियों में संलिप्त लोग अपराध के वक्त पुलिस और सबकी नजरों से बचने के लिए फैंसी नंबर प्लेट का इस्तेमाल करते हैं। जैसी कि नंबर को मां, भाई और दादा का आकार देने वाले वाहन चालकों की संख्या अधिक है।

"अक्सर पाया गया है कि जो लोग आपराधिक मामलों में लिप्त होते हैं, वही सबसे ज्यादा अपनी गाड़ियों के नंबर प्लेट से छेड़छाड़ करते हैं। जबकि कुछ लोग रौब जमाने के लिए अपनी जाती या धर्म को नंबर का रूप दे देते हैं, ऐसे लोगों पर कार्रवाई लगातार की जा रही है, और आगे भी होती रहेगी।

-प्रवीण बागड़े, सहायक अधिकारी, विरार आरटीवो

CamScanner

लोकमत

# अनधिकृतपणे वीजवापरप्रकरणी गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : येथे महावितरणाची कोणतीही परवानगी न घेता वीज वापर केल्याबद्दल सतरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीराम नगर, बिलालपाडा, गावराईपाडा, विशाल पांडे नगर आदी परिसरात सप्टेंबर ते नोव्हेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे वीज वापर करून कंपनीची ३१९१२ युनिट वीज वापर करून १७ जणांनी ५ लाख २६ हजार २९८ रुपयांचे आर्थिक नुकसान केले होते. महावितरणाचे सहाय्यक अभियंता किरण माने यांनी मंगळवारी तुळींज पोलीस ठाण्यात तक्रार देऊन सतरा आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 02, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

# मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय तपासात नंबर वन

## गुन्हे उघडकीचे प्रमाण ८५ टक्क्यांवर

भाईंदर, दि. २ (सा.वा.) – मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय तपासात नंबर वन राहिले असून तत्कालीन पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी अनेक उपक्रम राबवत गुन्हे उघडकीचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेले होते. त्यानंतर पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्याला प्रथम प्राधान्य दिले. यामुळे शहरातील गुन्हेगारीला आळा बसला असून आयुक्तालयातील उघड गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्क्यांपर्यंत झाले आहे.



पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आयुक्तालयात प्रत्येक महिन्यात होणाऱ्या आढावा बैठकीत सन्मानित करण्यात येते. मीरा-भाईंदर व वसई-विरार शहरातील अत्यंत क्लिष्ट गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास केल्यामुळे अनेक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२१ या वर्षात खुनाचे ५२ गुन्हे दाखल होते. त्यापैकी ४७ गुन्हे उघडकीस आले होते. उघडकीस आणल्या जाणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण ९० टक्के होते, तर २०२२ मध्ये खुनाचे ३८ गुन्हे दाखल असून १०० टक्के गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

### १६ पोलीस ठाण्यांचा आलेख चढा

खून, विनयभंग, अपहरण, दुखापत, चेन चोरी व इतर जबरी चोरी यांचे २०२१ व २०२२ मधील दाखल व उघड गुन्ह्यांचे प्रमाण पाहिले असता २०२२ या वर्षात सर्वात अधिक गुन्हे उघडकीस आणण्यात आले. आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलीस ठाण्यांमध्ये २०२२ पर्यंत उघड गुन्ह्यांचे प्रमाण ८५ टक्के आहे

CamScanner

लोकमत

# पत्नीनेच दिली पतीच्या हत्येसाठी सुपारी

## आरोपींना ४८ तासांत अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पत्नीनेच पतीच्या हत्येची एक लाखाची सुपारी दिल्याचे उघड झाले आहे. सुपारी देणाऱ्या पत्नीसह तीन आरोपींना ४८ तासांत अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पोलिसांना यश आले आहे, अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. ही हत्या अनैतिक संबंधातून झाली असल्याची चर्चा असल्याने पोलिस त्याच दृष्टीने तपास करत आहेत.

२७ जानेवारीला संध्याकाळी नायगाव रिक्षा स्टँडजवळील ब्रिजखाली खाडीच्या पाण्यात एका व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने खाडीत फेकून दिल्याने फुगलेल्या, कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या मृतदेहाची ओळख पटविणे व आरोपींचा शोध घेणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहुराज रणवरे यांनी पाच पथके तयार केली होती. पोलिस आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाण्यांतील मिसिंग रजिस्टर तपासले. मात्र, काहीही माहिती प्राप्त न झाल्याने मुंबई, ठाणे व नवी मुंबईतील पोलिस ठाण्यांतील मिसिंग रजिस्टर चेक केले. यातील मृताने परिधान केलेल्या कपड्यांचे वर्णन मुंबईतील बांगूरनगर पोलिस ठाण्यात मिसिंग व्यक्तीच्या कपड्याशी जुळले. त्याचे नाव कमरुद्दीन मोहम्मद उस्मान अन्सारी (३५) हे असल्याचे निष्पन्न केले.

### पैशांच्या हव्यासापोटी केला प्रकार

- गोरेगाव येथे राहणाऱ्या कमरुद्दीन यांच्या शेजारी राहणारे आरोपी बिलाल उर्फ मुल्ला पठाण (४०), त्याची पत्नी सोफिया पठाण (२८) हे घटना घडल्यापासून परिसरातून निघून गेल्याची माहिती मिळाली.
- ते वापी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यांना त्या ठिकाणावरुन ताब्यात घेऊन सखोल चौकशी केल्यावर त्यांनी पैशाच्या हव्यासापोटी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.
- तसेच पतीच्या हत्येसाठी प्रेरणा देणारी त्याची पत्नी आशिया अन्सारी हिला वालीव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



CamScanner

# 1 DEAD IN CAR CRASH ON VIRAR H'WAY



A resident of Gandhinagar was killed after his Gujarat-bound vehicle rammed into a truck in the opposite lane at Khanivade bridge near Virar. Arunkumar Jeevanbhai Parekh, 38, lost control of his Scorpio car after one of its tyres burst; the vehicle rammed into a truck coming from the opposite direction

# Woman arrested for flesh trade racket

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

The Anti-Human Trafficking Unit (AHTU) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police on Wednesday busted a prostitution racket and arrested a middle-aged woman in Kashimira. Two young women were also rescued.

Acting on a tip-off about the immoral trafficking of women in the twin city, a team led by ASI-Umesh Patil under the supervision of Police Inspector Samir Ahirrao established contact with the woman living in Mira Road through a decoy customer.

It came to light that the suspect woman used social messaging platforms including the WhatsApp application to communicate with potential clients by sharing photographs of women she had to offer for the rendezvous.

After striking a deal, the decoy informed the police team following which a trap was laid near Hotel Delhi Darbar.

The police team arrested the pimp and rescued two young women from her clutches. However, the mastermind of the racket is still at large.

A case under section 370 of the IPC and relevant sections of the Prevention of Immoral Trafficking Act (PITA) has been registered against the woman who has been remanded to custody. The rescued women have been shifted to a rehabilitation centre. Further investigations were underway.

THE FREE PRESS JOURNAL Fri, 03 February 2023
https://epaper.freepressjournal.in/c/71585945

CamScanner